**1F1** **A1**

D.El.Ed. Examination

JUNE, 2017

# MODEL ANSWER AND SCHEME OF MARKING

First Year (2016 Revised Syllabus)

## CHILD DEVELOPMENT AND SELF AWARENESS

(Marathi Medium)

Time : 11.00 to 1.00 Hrs.

Date : 1/6/2017 (12 Pages) Max. Marks : 40

1. खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडा : 8

(अ) पुढील दिलेल्या चुकीच्या विधानातील आशय दुरुस्त करून लिहा : 6

(1) शैशवावस्था 1

(2) सहा 1

(3) कुमारावस्था 1

(4) TQM 1

(5) स्वचिंतन 1

(6) भावना. 1

(ब) खालील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा : 2

(1) लहान मेंदूपासून खाली पाठीच्या कण्यामध्ये जाणारा दोरीसारखा भाग मज्जारज्जू होत. 1

(2) व्यक्तिमत्त्व विकासामध्ये प्रभावी **दोन** घटक : 1

(*i*) जैविक घटक

(*ii*) परिस्थितीजन्य घटक.

2. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60 ते 80 शब्दांत लिहा : 8

(1) विकास—बालकामध्ये होणारे इष्ट ते गुणात्मक व संख्यात्मक बदल म्हणजे विकास होय : 2

- परिपक्वतेच्या दिशेने होणारे परिवर्तन म्हणजे निश्चित दिशेने, क्रमशः सुसंगतपणे व प्रागतिक स्वरूपात बदल होण्याची प्रक्रिया म्हणजे.
- विकासात नियमबद्धता असल्याने सर्व गोष्टी एकदम नजरेत येत नाहीत.
- विकासात शारीरिक मानसिक प्रगती अभिप्रेत असते.

(व्याख्या 1 गुण, 2, उदा. 1 गुण)

(2) अंध मुलांसाठी तुम्ही शिक्षक म्हणून शैक्षणिक साधनांचा व उपकरणांचा उपयोग : 2

(1) ब्रेल पुस्तक

(2) लेखन पाटी

(3) अबॅकस

(4) स्पॅटव्हील

(5) कॅसेट टेपरेकॉर्डर

(6) थार्माकोल मशीन

(7) टेलर फ्रेम (गणित पाटी)

(8) रबरमॅट व भूमिती साधने

(9) हस्ताक्षर मार्गदर्शिका

(10) गतिशील काठी.

(वरीलपैकी कोणतेही चार शैक्षणिक साधनांचा व उपकरणांचा उपयोग प्रत्येकी 1/2 गुण)

(3) * कार्यशाळेचे आयोजन करणे 2

* व्यक्तिमत्त्व विकासाचे शिबिर. तीन दिवसाचे तीन विभागामध्ये

* नियोजन तक्ता

* उपक्रम :

  * तज्ञ व्यक्तीचे व्याख्यान


  * आरोग्य शिबिर

  * हस्ताक्षर स्पर्धा

  * स्वच्छतेचे महत्त्व

वरीलप्रमाणे नियोजनासाठी 2 गुण साठी.

(4) एडगर डेल यांच्या अनुभव शंकूची रचना व आकृती : 2




3. *खालील प्रश्नांची उत्तरे 120 ते 160 शब्दांत लिहा :* 12

(1) व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम घटक : 3

(अ) **जैविक घटक :**

(1) शरीररचना

(2) जैविक रसायने

(3) विशेष क्षमता.

(ब) बाह्य घटक :

(1) कुटुंब

(2) शाळा

(3) समाज

(4) मित्र

(5) सामाजिक वातावरण

(स्पष्टीकरणासह वरील सहा मुद्दे 1/2 गुण)

(2) अस्थिव्यंगता म्हणजे काय ? हे सांगून अस्थिव्यंगाचे विविधप्रकार : 3

व्याख्या—शरीरातील सांधे, हांडे यांमध्ये निर्माण झालेल्या दोषांमुळे हात, पाय या अवयवाच्या हालचालीवर व कार्यशीलतेवर येणाऱ्या मर्यादांना अस्थिव्यंग म्हणतात.

प्रकार :

(1) पोलिओग्रस्तता

(2) मेंदूचा पक्षाघात

(3) अपघाती अपंगत्व.

(व्याख्या 1 गुण स्पष्टीकरणासह प्रकार 2 गुण)

किंवा

शत्रुसंधो (SWOT) तंत्राची गुणवैशिष्ट्ये : 3

(1) स्वत:स ओळखून स्वगतीने विकास

(2) स्वत:चे दोष लपविण्याऐवजी ते कमी करण्याचा प्रयत्न

(3) भविष्यकालीन संधीचा वेध.

(4) विधायक दृष्टिकोन निर्माण होतो.

(5) प्राप्त परिस्थितीचे ज्ञान होते.

(6) स्वत:चा उद्धार स्वत: करणे.

(वरीलप्रमाणे सहा मुद्दे स्पष्टीकरणासह प्रत्येकी 1/2 गुण, 3 गुण)

(3) **मुलाखत घेताना दक्षता किंवा उपाय :** 3

(1) मुलाखत घेताना घरगुती वातावरण तयार करा.

(2) सर्व मते शांतपणे ऐकून घेणे.

(3) मुलाखत देणाऱ्या व्यक्तीला अधिकाधिक बोलण्याची संधी द्या.

(4) दिलेल्या उत्तरांची जाहीर चर्चा करू नये.

(5) मुलाखत देण्यासाठी स्वखुषीने येईल अशी परिस्थिती तयार करा.

(6) मुलाखत देणारा भावनाप्रधान होणार नाही.

(स्पष्टीकरणासह सहा मुद्दे प्रत्येकी 1/2 गुण)

किंवा

शैशवावस्थेतील बालकाच्या शारीरिक विकासासंदर्भात खालील गोष्टी करून घ्याव्यात :

(1) बालकमंदिरात पालकांनी पाठविलेल्या आहाराचा डबा बालकांना योग्यवेळी खाण्यास द्यावा

(2) या वयातील बालकांच्या हालचाली ओबडधोबड स्वरूपाच्या असतात. योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या हालचाली सफाईदार होतील याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे.


(3) बोटांच्या हालचाली एकदम सफाईदारपणे होत नसल्याने बालकमंदिरात लेखन संदर्भात कृती न करून घेता त्यांना कथा सांगणे, खेळ खेळणे, गाणी ऐकविणे इ. गोष्टी करून घेण्यावर भर द्यावा.

(4) श्वसन व रक्ताभिसरणाचा विकासाचा वेग वयानुरूप बदलतो हे लक्षात घेऊन शालेय कार्यक्रम आखावेत.

(5) पेन्सील धरणे, रेषा काढणे, खडूने चित्र काढणे, क्रेऑन कलरचा वापर करणे अशा प्रकारची कार्ये बालकांना करू द्यावीत.

(वरीलप्रमाणे कोणतेही तीन मुद्दे स्पष्टीकरणासह प्रत्येकी 1 गुण)

(4) **जॉन ड्युई यांच्या मते अनुभवाचे प्रकार :** 3



शैक्षणिक अनुभव हे बालकांमध्ये खालील क्षमता :

(1) पूर्वानुभवाशी संबंध जोडण्याची क्षमता

(2) अनुभावांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता

(3) अनुभवांचे योग्य अर्थनिर्वचन करण्याची क्षमता

(4) अनुभवधिष्ठित वृत्ती व दृष्टिकोन निर्माण होण्याची क्षमता.

बालकांना जितके अनुभव जास्त मिळतील तितकी त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासित होण्यास मदत होईल.

(सर्व मुद्दे 1 प्रत्येकी गुण)

4. ***खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 200 ते 250 शब्दांत :*** 12

(1) मेंदूच्या डाव्या व उजव्या गोलार्धाच्या कार्यातील महत्त्व : 4

**उजवा मेंदू**–सहजसुलभ कल्पना करणे, एकाचवेळी अनेक गोष्टीकडे लक्ष देणे, कविता, कला, कलांचे प्रकटीकरण करणे, चित्रे, प्रतिमा तयार करणे, सहसंबंध दाखविण्यासाठी गोष्टीचा क्रम लावणे, आठवणे इत्यादी बाबी.

- ज्यांचा उजवा मेंदू जास्त कार्यप्रवण असतो, त्या व्यक्तीना नवनिर्मिती करणे.
- भावनात्मक कार्ये करणे, छंद जोपासणे, व्यक्ती कलात्मक, कल्पक, आध्यात्मिक सर्जनशील अशा असतात.

डावा मेंदू—डाव्या मेंदूने तार्किक पद्धतीने विचार करणे, समस्या निवारण, तर्काच्या आधारे अनुभव काढणे, अंदाज करणे, घटनेची कारणमीमांसा शोधणे, एकावेळी एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे.

प्रत्येक व्यक्ती मेंदूच्या दोन अर्धगोलांपैकी कोणत्यातरी एका अर्धगोलाचा जास्त वापर करते. या प्रवृतीला अर्धगोलाची निवड म्हणतात.

(वरीलप्रमाणे कोणतेही चार मुद्द्यांचे स्पष्टीकरण प्रत्येकी 1 गुण)

(2) कौमार्यावस्थेतील मानसिक ताण कमी करण्यासाठी शिक्षकाची भूमिका : 4

(1) क्रीडाप्रवृत्ती

(2) बौद्धिक स्पर्धा

(3) लैंगिक शिक्षण

(4) अनुकरण किंवा नक्कल

(5) सहानुभूती

(6) संघशक्तीचा उपयोग

(7) राष्ट्रीय एकात्मता.

याशिवाय अभ्यासूवृत्ती, दृढ विश्वास, सत्य-दर्शनाची आवड, वैचारिक सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केल्यास कौमार्यावस्थेतील मुलांचा विकास हा अधिक वेगाने व जोमाने करण्याचा प्रयत्न शाळेने व शिक्षकाने केला पाहिजे.

(स्पष्टीकरणासह वरील प्रमाणे चार मुद्दे, प्रत्येकी 1 गुण)

(3) अंध विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साधनांची माहिती : 4

(1) ब्रेल लेखन पाटी

(2) ॲबॅकस पाटी

(3) ब्रेल टाईपरायटर

(4) बोलका संगणक

(5) बोलकी पुस्तक

(6) उठावाचे नकाशे

(7) ब्रेल घड्याळ.

अंध मुलांसाठी वर्गव्यवस्था :

(1) अंध मुलांना वर्गात पुढील बाकावर बसवावे. त्यांच्या शेजारी एक सामान्य विद्यार्थी बसवावा.

(2) अंध विद्यार्थ्यांची बसण्याची जागा पाठीमागून उजेड येईल अशी असावी.

(3) ब्रेल लेखनासाठी लेखनपाटी, गणितपाटी, ड्रॉईंगपेपर, जाड ब्रेल पेपर इ. साहित्य सुस्थितीत ठेवावे.

(4) वर्गात ब्रेल तक्ते, नकाशे, चित्रे अंध विद्यार्थ्यांना सहजपणे पाहता येईल, वापरता येतील असे लावावेत.

(5) उठावदार नकाशे, प्रतिकृती दाखवून स्पर्शाद्वारे मुलांना ज्ञान द्यावे.

(6) ब्रेल टाईपरायटर, ब्रेल तक्ते सहज हाताला लागतील असे ठेवावेत.

(7) अनुभव पक्के करण्यासाठी या मुलांना प्रत्यक्ष वस्तू दाखवणे व विविध अनुभव घेण्यास उत्साहित करावे.

(8) भूगोल विषयासाठी उठावाचे नकाशे, पृथ्वीचा गोल वस्तूच्या प्रतिकृती, विज्ञान, इतिहास, गणित विषयासाठी लागणारी उठावाची साधने उपलब्ध करून दयावीत.

(साधने 1 गुण, वर्गव्यवस्थेचे **तीन** मुद्दे, 3 गुण)

**किंवा**

कर्णबधिर मुलांसाठी खालील शैक्षणिक साधने : 4

(1) वैयक्तिक श्रवण यंत्र

(2) समूह श्रवण यंत्र

(3) इंडक्शन लूप सिस्टीम

(4) वाचा दुरुस्ती यंत्र

(5) श्रवण-हास मोजण्याचे यंत्र

(6) सचित्र शब्दसंग्रह गोष्टी

(7) स्मृती पाट्या

(8) उर्ध्वशीर्ष प्रक्षेपक

(9) तक्ते, चित्रे, नकाशे, प्रतिकृती

(10) ॲनिमेशन फिल्मस्.

वर्गव्यवस्था :

(1) ओठांची हालचाल, खुणांची पद्धत न समजल्यास प्रत्यक्ष कृतीतून अथवा चित्रे प्रतिकृतीतून दाखवावे लागते म्हणून मुलांना या बाबी सहज दिसतील अशा प्रकारची व्यवस्था करावी.

(2) गरज पडल्यास ओठाच्या हालचाली, बोटांच्या खुणा, उंचावर किंवा जवळ दिसेल अशा तऱ्हेने बैठक.

(3) विशेष शाळेत विद्यार्थी संख्या 10–12 अपेक्षित. बैठकव्यवस्था अर्धगोलाकार.

(4) शिक्षकाच्या चेहऱ्यावर पुरेसा प्रकाश येईल.

(5) शिक्षक व विद्यार्थी यांच्या डोळ्याची पातळी एक असेल.

(6) अल्पश्रवण किंवा कमी ऐकू येते यांना पुढच्या बाकावर बसवून घ्यावे. त्याच्यांशी बोलताना अधिक मोठ्याने बोलावे.

(7) वर्गामध्ये आपण जी शैक्षणिक साधने वापरणार आहोत ती त्यांना स्पष्टपणे व सहजपणे पाहता येतील याची व्यवस्था करावी.

(वरीलप्रमाणे कोणतेही **चार** शैक्षणिक साधने व वर्गव्यवस्थेची रचना स्पष्टीकरणासह, प्रत्येकी **1/2** गुण)